# वर्येत विद्यार्थ्यांकडून सायबर सुरक्षेचे धडे

शेंद्रे : वर्ये (ता. सातारा) येथील कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अ‍ॅण्ड रिसर्चच्या विद्यार्थ्यांनी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित रयत रॅलीत सायबर जनजागृती केली. सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या प्रकल्पांतर्गत हा उपक्रम राबविण्यात आला. त्यात २० शाळा, दहा कॉलेजच्या विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत जागरूक केले. यावेळी नाटिकेद्वारे सुमारे चार हजार विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे धडे दिले. प्राचार्य डॉ. बी. एस. सावंत, विभागप्रमुख डॉ. आर. डी. कुंभार, डॉ. सारंग भोला, तेजश्री शेवते आदींचे मार्गदर्शन लाभले.

## सकाळ कनेक्ट